**आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,**
**राष्ट्रीय आरोग्य अभियान**
सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail – mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१

जा.क्र.राआअमुं/मनुष्यबळ/कोविड-१९पदभरती/ /२०२०
दिनांक – १६ जुलै, २०२० १२६९८-९५६

प्रति,
१. जिल्हाधिकारी (सर्व)
२. मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)

**विषय :** कोविड-१९ अंतर्गत वैद्यकीय अधिकारी व परिचारीका नियुक्तीबाबत

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यांत कार्यरत DCH व DCHC केंद्रावर एम.बी.बी.एस. अर्हतेचे उमेदवार व अधिपरिचारीका संवर्गातील उमेदवार उपलब्ध होत नसल्याने एम.बी.बी.एस. ऐवजी आयुष आणि बी.डी.एस. अर्हताधारक व जी.एन.एम. अधिपरिचारीकांच्या ऐवजी ए.एन.एम. नियुक्त करण्याची परवानगी देण्याबाबत काही जिल्ह्यांकडून विनंती करण्यात येत आहे. या अनुषंगाने पुढील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

**अ) एम.बी.बी.एस. ऐवजी इतर अर्हताधारक उमेदवारांची नियुक्ती –**

DCH व DCHC केंद्रावर एम.बी.बी.एस. उमेदवार मिळत नसल्यास बी.ए.एम.एस., बी.यु.एम.एस व बी.डी.एस. अर्हताधारक उमेदवार नियुक्त करण्यास खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे.

१. DCH व DCHC येथे २४ तास एम.बी.बी.एस. अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी कार्यरत असणे आवश्यक आहे. यासाठी किमान दोन एम.बी.बी.एस. डॉक्टरांची नेमणूक करावी. उर्वरीत पदे बी.ए.एम.एस., बी.यु.एम.एस. आणि बी.डी.एस. अर्हताधारक उमेदवारांमधून भरता येतील.
२. बी.ए.एम.एस./बी.यु.एम.एस./बी.डी.एस. डॉक्टर्स तेथील एम.बी.बी.एस. अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार कामकाज करतील.
३. कंत्राटी एम.बी.बी.एस. डॉक्टर मिळेपर्यंत शासन/जिल्हा परिषद सेवेतील नियमित/कंत्राटी एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिका-यांच्या सेवा घ्याव्यात.

**ब) अधिपरिचारीका ऐवजी ए.एन.एम. यांची नियुक्ती –**

DCH व DCHC केंद्रावर अधिपरिचारीका उपलब्ध होत नसल्यास ए.एन.एम. नियुक्त करण्यास खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे.

१. DCH व DCHC केंद्रावर २४ तास किमान एक अधिपरिचारीका कार्यरत असणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

२. कार्यरत अधिपरिचारीकांच्या सुचनांनुसार ए.एन.एम. कामकाज करतील.
३. कंत्राटी जी.एन.एम./बी.एस.सी.(नर्सिंग) अधिपरिचारीका उपलब्ध होईपर्यंत शासन/जिल्हा परिषद सेवेतील नियमित/कंत्राटी अधिपरिचारीकांच्या सेवा घ्याव्यात.

उपरोक्त अटींसह खालील सुचनांचेही पालन करावे.

१. DCH येथे आय.सी.यु. मध्ये कोणत्याही परिस्थितीत फक्त एम.बी.बी.एस. डॉक्टर्स व जी.एन.एम./ बी.एस.सी.(नर्सिंग) अधिपरिचारीका उपलब्ध असतील. तेथे इतर अर्हताधारक डॉक्टर्स आणि ए.एन.एम. यांची नियुक्ती करण्यात येऊ नये.
२. उपरोक्त नेमणूक ही एम.बी.बी.एस. डॉक्टर्स व जी.एन.एम. नर्स उपलब्ध होईपर्यंतच असेल या अटीचा समावेश नियुक्ती पत्रात करण्यात यावा.
३. प्रस्तावास संबधित जिल्हाधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.
४. कोविड-१९ पदभरतीच्या अनुषंगाने दिलेल्या सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(डॉ. अनुपकुमार यादव)
आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

प्रत पुढील कार्यवाहीस्तव :-

१) जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व)
२) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)

प्रत माहितीस्तव सादर : -

१. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य सेवा, मंत्रालय, मुंबई
२. संचालक, आरोग्य सेवा (१/२) , मुंबई/ पुणे

Scanned by CamScanner